दैनिक
अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | रविवार, 1 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 168 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

बीड एलसीबीची धडक कारवाई

तीर्थपुरी-जालना येथील आंतरजिल्हा अट्टल घरफोड्यांच्या टोळीला ठोकल्या बेड्या

■ नेकनूर/बीड:

जिल्ह्यात घरफोडी आणि वाहन चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा गुन्हेगारांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा (LCB) व नेकनूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. जालना जिल्ह्यातील तीर्थपुरी येथील चार अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गेवराई बायपास येथे सापळा रचून ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ४ गुन्हे उघडकीस आणत ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

९ लाखांचा मुद्देमाल जप्त!

CCTV फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाने उघड झाले धागेदोरे

■ पोलीस ठाणे नेकनूर येथे दाखल घरफोडीच्या गुन्ह्याचा (गुरन. ४४१/२०२६) समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत होती. घटनास्थळाची पाहणी व परिसरातील CCTV फुटेज तपासून ४ संशयित आरोपींची ओळख पटवण्यात आली. तांत्रिक विश्लेषण आणि बातमीदारांमार्फत मिळालेल्या महितीनुसार हे चोरटे लाल-काळ्या रंगाच्या टी.यु.व्ही. गाडीने जालन्याहून बीडकडे येत असताना गेवराई बायपास येथे दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी एलसीबी पथकाने सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले.

■ १) बालसिंग अमलरसिंग टाक (वय ३० वर्ष, रा. संभाजीनगर तीर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना) २) नानकसिंग मगबलसिंग बावरी (वय २२ वर्ष, रा. संभाजीनगर तीर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना) ३) अरूणसिंग जगतापसिंग बावरी (वय २० वर्ष, रा. संभाजीनगर तीर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना) ४) इरफान बनिमियाँ सय्यद (वय २० वर्ष, रा. रूई, ता. अंबड, जि. जालना) उघडकीस आलेले गुन्हे (घरफोडी ३ व वाहन चोरी १) कडक चौकशीअंती आरोपींनी बीड जिल्ह्यातील खालील गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्यांच्याकडून एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे गुरन. ४४१/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) BNS) पोलीस ठाणे धारूर: गुरन. १०/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) BNS) पोलीस ठाणे केज: गुरन. ६२४/२०२६ (कलम ३०३(२) BNS) पोलीस ठाणे दिंद्रुड: गुरन. ०९/२०२६ (कलम ३०५, ३३१(४) BNS) आरोपींना मुद्देमालासह पुढील तपासासाठी नेकनूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तपास पथकात पोउपनि महेश विघ्ने, पोह/बप्पासाहेब घोडके, पोह/जफर पठाण, पोह/महेश जोगदंड, पोह/दिलीप गित्ते, चापोह/गणेश मराडे व पोअ/विकी सुरवसे यांचा समावेश होता.

नांदडी जिल्हा परिषद शाळेत मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालयांची सुविधा

■ अंबाजोगाई, प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अनुषंगाने अंबाजोगाई तालुक्यातील नांदडी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी मुलांचे व मुलींचे स्वतंत्र शौचालय बांधण्यात आले आहे. या शौचालयांचा लोकार्पण सोहळा ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व १५ व्या वित्त आयोगाच्या ग्रामपंचायत निधीतून जिल्हा परिषद शाळा नांदडी येथे शौचालयाचे बांधकाम करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही सुविधा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था झाल्यामुळे विद्यार्थिनींची मोठी गैरसोय दूर होणार आहे. या कामासाठी गटविकास अधिकारी कैलास बळवंत, राहुल दुबे तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अभियंता राधिका पाचफुले यांचे सहकार्य लाभले.

यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक आवाड यांनी मनोगत व्यक्त करताना शौचालयाच्या बांधकामाची गुणवत्ता व दर्जा याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील काळात गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत आवश्यक ती मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. वरपगाव येथील मुख्याध्यापकांनीही शाळा आदर्श शाळा बनविण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सरपंच महादेवी बाळासाहेब देशमुख, ग्रामपंचायत अधिकारी सुनील शिवाजीराव मामडगे, उपसरपंच बालाजी देशमुख, नितीन हातागळे, शिवानंद वाघमारे, कामिनी कनकुटे, नाना माने, प्रीती किचमे, आबासाहेब देशमुख, ललिता जगताप, दगडूसाहेब देशमुख, गोविंद देशमुख, हरिश्चंद्र वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती किचमे यांनी केले, तर आभार सरपंच महादेवी देशमुख यांनी मानले.

नांदडी ग्रामपंचायत मुख्यमंत्री ग्राम समृद्ध ग्रामपंचायत अभियानामध्ये धडाडीने काम करत आहे. गावातील ग्रामस्थ स्वच्छतेसह विविध उपक्रम राबवत आहेत. गेल्या अनेक दिवसापासून मुलींकरता स्वतंत्र शौचालय पाहिजे अशी मागणी ग्रामपंचायत कडून होती. आम्ही त्याला तात्काळ मंजुरी दिली.
- **कैलास बळवंत** गटविकास अधिकारी अंबाजोगाई

स्वच्छ भारत मिशन व १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून बांधकाम; लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणारा 'उद्योजिका दिवाळी महोत्सव' कौतुकास्पद : आमदार ठाकूर

पनवेल महापालिकेचा स्तुत्य उपक्रम ; महिला उद्योजिका व बचत गटांच्या उत्पादनांना विक्रीचे व्यासपीठ

■ मुंबई वृत्तसंस्था

"महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देत त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणारा पनवेल महानगरपालिकेचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे," असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे आयोजित 'उद्योजिका दिवाळी महोत्सव २०२६'चे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी उत्साहात झाले. यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे, समितीच्या सदस्या, नगरसेवक व नगरसेविका, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणाऱ्या या महोत्सवामुळे महिलांच्या कौशल्याला व कष्टाला योग्य संधी मिळत आहे. नागरिकांनी महोत्सवाला भेट देऊन महिला उद्योजिकांकडून खरेदी करावी आणि त्यांच्या व्यवसायाला पाठबळ द्यावे, असे आवाहन आमदार ठाकूर यांनी केले. महोत्सवात महिला उद्योजिका आणि महिला बचत गटांनी तयार केलेला दिवाळी फराळ, हस्तकलेच्या वस्तू, दागिने, सजावटीचे साहित्य, साड्या, ड्रेस, आयुर्वेदिक उत्पादने व विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यासोबतच बालमित्रांसाठी 'छोट्यांची मोठी दुनिया' या संकल्पनेतून फिरते तारांगण, छोटे इंजिनिअर्स, मिनी कार रेसिंग आणि छोटे शेफ अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. खेळातून शिकण्याची संधी देणारे हे उपक्रम मुलांची जिज्ञासा, कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वाढविण्यास उपयुक्त ठरणार आहेत.

"आपल्या खरेदीतून भगिनींची दिवाळी गोड करूया!"

■ "माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या महिला सक्षमीकरणाच्या विचारातून प्रेरणा घेत, महिला उद्योजिका व बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, यासाठी हा महोत्सव आयोजित केला आहे. दुष्काळाच्या कठीण काळात आपल्या भगिनींचीही दिवाळी गोड व्हावी, यासाठी नागरिकांनी त्यांच्याकडून खरेदी करून त्यांच्या कष्टाला साथ द्यावी."

■ ममता प्रितम म्हात्रे, सभापती,
महिला व बालकल्याण समिती, पनवेल महानगरपालिका

महोत्सवाला अवश्य भेट द्या!

■ महोत्सव ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत नूतन गुजराती शाळा मैदान, पटवर्धन हॉस्पिटलसमोर, पनवेल येथे नागरिकांसाठी खुला आहे. नागरिकांनी कुटुंबासह भेट देऊन दिवाळीच्या खरेदीसोबत बालमहोत्सवाचाही आनंद घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे करण्यात आले आहे.

संपादकीय

विकासाच्या नावाखाली सह्याद्रीचा बळी कशासाठी?

महाराष्ट्राच्या विकासाची गाडी वेगाने धावावी, उद्योग वाढावेत, ऊर्जा उपलब्ध व्हावी आणि रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. मात्र, या विकासाची किंमत जर सह्याद्रीच्या निसर्गाला, आदिवासींच्या अस्तित्वाला आणि शेकडो वर्षांच्या गावसंस्कृतीला मोजावी लागणार असेल, तर अशा विकासाच्या दिशेवर प्रश्न उपस्थित करणे हे प्रत्येक जागरूक नागरिकाचे कर्तव्य आहे. माळशेज घाट परिसरातील प्रस्तावित १५०० मेगावॅटच्या वीज साठवण प्रकल्पामुळे निर्माण झालेला वाद हा केवळ एका कंपनीचा किंवा एका प्रकल्पाचा विषय नाही; तो विकासाच्या नावाखाली निसर्ग आणि स्थानिक जनतेला किती किंमत मोजायला लावायची, याचा गंभीर प्रश्न आहे.

रायगड जिल्ह्यातील कर्जत,ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील भोरांडे आणि पुणे जिल्ह्यातील जुन्नर परिसरातील गावांमध्ये या प्रकल्पाविरोधात असंतोष वाढत आहे. स्थानिकांच्या दाव्यानुसार, या प्रकल्पामुळे ठाणे जिल्ह्यातील ५५ आणि पुणे जिल्ह्यातील २४ गावांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. धरणे, जलाशय आणि बोगद्यांच्या माध्यमातून वीज साठवणूक करण्याच्या या योजनेमुळे स्थानिकांच्या जमिनी, उपजीविका आणि पर्यावरणावर नेमके किती परिणाम होतील, याची पारदर्शक माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. प्रश्न वीज निर्मितीचा नाही, तर विकासाच्या पद्धतीचा आहे! पंप स्टोरेज प्रकल्प हा अतिरिक्त वीज वापरून पाणी उंच जलाशयात चढवतो आणि गरजेच्या वेळी ते खाली सोडून वीज निर्माण करतो. ऊर्जा साठवणुकीच्या दृष्टीने ही पद्धत महत्त्वाची ठरू शकते. मात्र, एखादा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या उपयुक्त आहे म्हणून तो पर्यावरणाच्या दृष्टीनेही निर्दोष आहे, असे गृहीत धरता येत नाही. सह्याद्रीतील डोंगररांगा, जंगल, जलस्रोत, जैवविविधता आणि स्थानिकांच्या जीवनपद्धतीवर होणाऱ्या परिणामांचा स्वतंत्र व सखोल अभ्यास झाला पाहिजे. अदानी कंपनीने या प्रकल्पामुळे पर्यावरण, स्थानिक समुदाय आणि उपजीविकेवर अपेक्षित प्रतिकूल परिणाम होणार नसल्याचा दावा केला आहे. कंपनीची भूमिका ऐकून घेणे आवश्यक आहे; परंतु त्याचवेळी ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरेही पुराव्यांसह दिली पाहिजेत. विकासकाचा दावा आणि ग्रामस्थांची भीती यांपैकी कोणतेही एक सत्य मानून निर्णय घेता येणार नाही. वस्तुनिष्ठ पर्यावरणीय मूल्यमापन आणि पारदर्शक सार्वजनिक चर्चा हाच योग्य मार्ग आहे.

गावकऱ्यांना अंधारात ठेवून विकासाचा उजेड कसा दाखवणार?

भोरांडे येथील सरपंच अप्पा कोकणे आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रकल्पाच्या सर्वेक्षणापासून मंजुरीच्या प्रक्रियेपर्यंत ग्रामस्थांना पुरेशी माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप केला आहे. प्रकल्पाच्या कागदपत्रांचा मोठा भाग इंग्रजीत असल्याने आदिवासी बांधवांना त्यातील तांत्रिक बाबी समजून घेण्यात अडचणी येत असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. जर हे आरोप खरे असतील, तर ही केवळ प्रशासकीय त्रुटी नाही; ती लोकशाहीतील जनसहभागाच्या तत्त्वालाच हरताळ फासणारी बाब आहे. ज्यांच्या जमिनीवर, जंगलावर आणि जीवनावर परिणाम होणार आहे, त्यांनाच प्रकल्पाची संपूर्ण माहिती मिळणार नसेल, तर निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेचा अर्थ काय? पर्यावरणीय अहवालाचा संपूर्ण मराठी अनुवाद, गावनिहाय परिणामांचा तपशील आणि स्वतंत्र तज्ज्ञांकडून स्पष्टीकरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

लोकार्थ

टेक्नोस्ट्रक्ट ग्रुपतर्फे 'टेक टॉक्स 2026' चे आयोजन

टेक्नोस्ट्रक्टने मुंबईत आयकॉनिका हॉटेलमध्ये 'टेक टॉक्स २०२६' च्या मुंबई सत्राचे आयोजन केले. यामध्ये बांधकाम व्यावसायिक, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, उद्योग भागीदार आणि बीआयएम तज्ज्ञांनी सहभाग घेतला. भविष्यात तंत्रज्ञान बांधकाम क्षेत्रात कसे परिवर्तन घडवून आणेल, ही या कार्यक्रमाची मुख्य संकल्पना होती.या कार्यक्रमात भारतात आणि पाश्चात्य देशांमध्ये बीआयएम (बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग) कसे स्वीकारले जात आहे,डिजिटल डबल आणि डिजिटल ट्विनमधील फरक,बांधकाम क्षेत्रातील वेगाने वाढणाऱ्या संधी,भविष्यसूचक विश्लेषण हरित पायाभूत सुविधा या विषयांवर चर्चा झाली: या कार्यक्रमात दोन प्रमुख घोषणा करण्यात आल्या.

ऑटोडेस्कसोबत भागीदारी टेक्नोस्ट्रक्ट भारतातील एक अधिकृत ऑटोडेस्क पुनर्विक्रेता आहे. यामुळे कंपन्यांना प्रकल्प समन्वय, माहिती व्यवस्थापन आणि बांधकाम कार्यांसाठी डिजिटल उपाययोजना स्वीकारण्यास मदत होईल.आणि "न्यूटन" चे अनावरण न्यूटन हे टेक्नोस्ट्रक्टचे नवीन प्रेडिक्टिव्ह डेटा ॲनालिटिक्स आणि इन्व्हेंटरी सोल्यूशन आहे. बांधकाम प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणात डेटा तयार होतो, परंतु त्यातून उपयुक्त माहिती काढणे कठीण असू शकते. न्यूटन मटेरियल प्लॅनिंग, इन्व्हेंटरी माहिती आणि वेळेवर निर्णय घेण्यास मदत करते.

फिक्की'च्या चौथ्या 'सागरी भारत परिषद सत्राला संबोधित करणार नितेश राणे

महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री श्री. नितेश नारायण राणे हे भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघ (फिक्की) आयोजित चौथ्या 'सागरी भारत परिषद आणि प्रदर्शना'च्या उद्घाटन सत्राला संबोधित करणार आहेत. या परिषदेचे उद्घाटन येत्या सोमवारी मुंबईतील बॉम्बे प्रदर्शन केंद्र येथे होणार आहे.२ ते ४ नोव्हेंबरदरम्यान आयोजित या तीन दिवसीय परिषदेत धोरणकर्ते, बंदर प्राधिकरणांचे अधिकारी, जहाजवाहतूक कंपन्या, जहाजबांधणी क्षेत्रातील कंपन्या आणि गुंतवणूकदार सहभागी होणार आहेत. भारताला जागतिक सागरी व्यापाराचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित या परिषदेची संकल्पना 'जागतिक सागरी व्यापाराचे केंद्र म्हणून भारत : व्यापार, परिवर्तन आणि शाश्वत विकास' अशी आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या प्रदर्शनाचा विस्तार लक्षणीयरीत्या वाढला आहे. आतापर्यंत १० हजारांहून अधिक व्यावसायिक अभ्यागतांनी नोंदणी केली असून, यंदा एकूण १६ हजार अभ्यागत सहभागी होण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मागील वर्षी ही संख्या ७,२०० होती.. या प्रदर्शनात १५० हून अधिक कंपन्या सहभागी होणार असून, त्यापैकी ९२ टक्के कंपन्या खासगी क्षेत्रातील आहेत.

बँक ऑफ इंडिया आणि सी-डॅक यांच्यात सामंजस्य करार

बँक ऑफ इंडिया आणि सी-डॅक जे भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत एक स्वायत्त वैज्ञानिक संगठन आहे यांनी बँकिंग क्षेत्रात क्वांटम वित्तीय नवोन्मेष आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या उद्देशाने एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली हा सामंजस्य करार बँक ऑफ इंडिया आणि सी-डॅकसाठी संयुक्त संशोधन, विकास, प्रायोगिक अंमलबजावणी, तंत्रज्ञान प्रात्यक्षिके आणि बँकिंग व वित्तीय सेवा क्षेत्रासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या तंत्रज्ञानामध्ये क्षमता बांधणीचे उपक्रम राबवण्यासाठी एक चौकट तयार करतो. या सहकार्यामुळे बँक ऑफ इंडियाचे बँकिंग क्षेत्रातील कौशल्य, त्यांची देशव्यापी उपस्थिती आणि उच्च-व्यवहार क्षमतेचे तांत्रिक वातावरण, तसेच सी-डॅकची उच्च-कार्यक्षमता संगणन कृत्रिम बुद्धिमत्ता क्वांटम तंत्रज्ञान, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा आणि स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यातील क्षमता यांचा संगम घडणार आहे.या भागीदारीचा मुख्य उद्देश वित्तीय नवोन्मेषासाठी एक 'क्वांटम इकोसिस्टम' विकसित करणे हा आहे. याद्वारे बँकिंग प्रणालींना क्वांटम तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या संधी आणि त्यासोबत येणारी नवीन सुरक्षा आव्हाने, या दोन्ही गोष्टींसाठी सज्ज केले जाईल.

भारतीय टपाल विभागातर्फे स्पीडपोस्ट सेवेचा मेट्रो मार्गांच्या पलीकडे विस्तार

भारतीय टपाल विभाग, महाराष्ट्र मंडळाने आपल्या प्रीमियम 24 स्पीड पोस्ट सेवेचा विस्तार सध्याच्या मेट्रो-टू-मेट्रो नेटवर्कच्या पलीकडे करण्याची घोषणा केली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिकआणि नागपूर मधील किरकोळआणि घाऊक ग्राहकांना जलद, वेळेत डिलिव्हरी देण्यासाठी महाराष्ट्र मंडळात एकूण 27 नवीन मार्गिका कार्यान्वित करण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत, ज्यामध्ये 25 कागद पत्रांसाठी आणि 2 पार्सलसाठी आहेत.सध्या, 24 स्पीड पोस्ट सहा प्रमुख शहरांना जोडते: दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आणि कोलकाता. मुंबईत, 29 नियुक्त पोस्ट ऑफिस इतर मेट्रो शहरांसाठी 24 स्पीड पोस्ट बुकिंग स्वीकारतात, तर येणाऱ्या डाक संपूर्ण शहरात वितरित केल्या जातात. नवीन विस्तारित मार्गिका अतिरिक्त डिलिव्हरी पिनकोडवर जलद, विश्वासार्ह वाहतुकीची वाढती ग्राहक मागणी पूर्ण करतील.किरकोळ आणि घाऊक ग्राहक नियुक्त बुकिंग कार्यालयांमध्ये 24 स्पीड पोस्ट सेवांचा लाभ घेऊ शकतात आणि त्यांच्या जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये विशिष्ट मार्गांसाठी सेवा उपलब्धतेची पुष्टी करू शकतात.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

चारा टंचाईवर मात करण्यासाठी राज्याचा कृती आराखडा ; चारा उत्पादनासाठी जिल्हा नियोजन निधीतील ५ टक्के निधी : पशुसंवर्धन मंत्री ना . पंकजाताई मुंडे

दुष्काळी भागातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी अभ्यासगटाच्या शिफारशींची अंमलबजावणी

■ मुंबई वृत्तसंस्था

एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण घटल्याने राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा उत्पादन, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यासाठी किमान पाच टक्के निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच चारा बँकांची स्थापना, हायड्रोपोनिक्स व अझोला पद्धतीने चारा उत्पादन, आंतरजिल्हा चारा वाहतूक आणि चारा छावण्यांचे डिजिटल पद्धतीने व्यवस्थापन अशा विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना सुचविण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीच्या निर्णयानुसार महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाने चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध शिफारशी केल्या आहेत. २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत या शिफारशी स्वीकारण्यात आल्या असून, त्यानुसार आज, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यातील सन २०२६ मधील दुष्काळजन्य परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन, चारा छावण्यांचे पारदर्शक व्यवस्थापन आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यासह विविध शिफारशी अभ्यासगटाने केल्या आहेत.

नियोजनबद्ध उपाययोजना

याबाबत पंकजाताई मुंडे म्हणाल्या, "दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, पशुपालक आणि त्यांच्या पशुधनाला चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी शासनाने नियोजनबद्ध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. केवळ चारा छावण्या सुरू करण्यापुरते मर्यादित न राहता चाऱ्याचे उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे योग्य संवर्धन करणे आणि पर्यायी चारा स्रोत विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी."

पशुसंवर्धन संस्थांच्या प्रक्षेत्रावरही चारा लागवड

अभ्यास गटाने सुचविलेल्या आराखड्यानुसार रब्बी हंगामात चारा बियाण्यांची कमतरता भासू नये, यासाठी महाबीज आणि इतर बियाणे उत्पादकांच्या माध्यमातून बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कमी पाण्यात येणाऱ्या आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणाऱ्या चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे आणि कृषी महामंडळाच्या जमिनीवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेझ, ज्वारी आणि बाजरी यांसारख्या चारा पिकांची लागवड करण्यात येणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारीतील संस्थांच्या प्रक्षेत्रावरही चारा लागवड केली जाणार आहे.

गायरान, कुरण, नापीक आणि पडीक जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यासाठी विविध विभागांच्या योजनांचा समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या सहकार्याने गाळपेरा क्षेत्र चारा लागवडीसाठी शेतकरी आणि पशुपालकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. वन विभागाच्या जमिनीवर उपलब्ध असलेले गवत वेळेत कापून त्याची साठवणूक केली जाणार असून, आवश्यकतेनुसार ते पशुपालकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

चारा बँक स्थापन करण्याची शिफारस ; चाऱ्याचे दर निश्चित

चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जिल्हानिहाय चारा बँका स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्या आणि स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाणार आहे. तसेच चारा कापणी आणि गठ्ठे बांधण्यासाठी कृषी व पशुसंवर्धन विभागाकडील यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जाणार आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन वाहतूक खर्च वगळता सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये, तर मुरघास प्रतिकिलो कमाल आठ रुपये अशी आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे.

चारा साक्षरता अभियान' राबविणार

पशुपालकांसाठी व्यापक 'चारा साक्षरता अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानात उपलब्ध चाऱ्याची योग्य कापणी व साठवणूक, मुरघास निर्मिती, युरिया व एन्झाइम प्रक्रिया तसेच भाताच्या पेंढीचे मूल्यवर्धन याबाबत प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके आयोजित केली जातील.

पारंपरिक चाऱ्यावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी हायड्रोपोनिक्स, अझोला आणि बिनकाटेरी निवडुंग लागवडीसारख्या पर्यायी पद्धतींना प्रोत्साहन दिले जाणार आहे. कमी पाणी आणि कमी जागेत अल्पावधीत सकस चारा उपलब्ध होऊ शकत असल्याने या पद्धतींचे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके पशुपालकांना दिली जाणार आहेत. राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हायड्रोपोनिक्स आणि अझोला पद्धतीने चारा उत्पादन करण्याचेही नियोजन आहे.

कामांसाठी चाऱ्याचा वापर करण्यास बंदी

चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याचा वापर केवळ पशुखाद्यासाठीच व्हावा, यासाठी पॅकिंग, बायोफ्युएल आणि वीजनिर्मितीसारख्या अन्य कामांसाठी चाऱ्याचा वापर करण्यास बंदी घालण्यात येणार आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीत राज्यातील चारा शेजारील राज्यांमध्ये पाठविण्यास कायदेशीर प्रतिबंध करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. एखाद्या जिल्ह्यात पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध नसल्यास जवळच्या जिल्ह्यातून चारा मिळविण्यासाठी विभागीय आयुक्त, पशुसंवर्धन विभाग आणि जिल्हाधिकारी यांच्यात समन्वय साधण्यात येणार आहे.

चारा छावणी मॉनिटरिंग अँड मॅनेजमेंट सिस्टीम' विकसित करणार

चारा छावण्यांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्यासाठी राज्यस्तरीय ऑनलाइन 'चारा छावणी मॉनिटरिंग अँड मॅनेजमेंट सिस्टीम' विकसित करण्यात येणार आहे. या प्रणालीद्वारे पशुधनाची नोंदणी, दैनंदिन उपस्थिती, चाऱ्याची प्राप्ती व वितरण, पाणी, पशुवैद्यकीय सेवा, खर्च आणि देयकांची माहिती उपलब्ध होणार आहे. प्रत्येक छावणीत बायोमेट्रिक किंवा क्यूआर कोडद्वारे उपस्थिती, भारत पशुधन प्रणालीतील नोंदणीची पडताळणी आणि २४ तास कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा बंधनकारक करण्यात येणार आहे.

चारा छावण्या समिती ; पालकमंत्री अध्यक्ष

चारा छावण्यांच्या नियोजनासाठी जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन संनियंत्रण व आढावा समितीमध्ये पालकमंत्र्यांचा अध्यक्ष म्हणून समावेश करण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समिती स्थापन केली जाणार आहे. स्थानिक परिस्थिती, पशुधनाची संख्या, चाऱ्याची उपलब्धता आणि पाण्याची स्थिती लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार चारा छावण्या सुरू करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. चारा व्यवस्थापनासाठी साखर कारखाने, दूध उत्पादक सहकारी संस्था, गोशाळा, सेवाभावी संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. साखर कारखान्यांच्या माध्यमातून उसाचे वाढे, बगॅस आणि मळी उपलब्ध करून घेण्याचे नियोजन आहे. चारा उत्पादनासाठी सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्याची शिफारसही करण्यात आली आहे. याशिवाय चारा छावण्यांमधील सुविधा, चारा कापणी यंत्रे, मुरघास निर्मिती, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेसाठी सीएसआर निधीचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभाग जिल्हानिहाय चारा ताळेबंद तयार करून साप्ताहिक अहवाल सादर करणार आहे. चारा छावण्यांतील जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन तसेच चारा व पशुखाद्याच्या दर्जाची तपासणीही करण्यात येईल. चारा उत्पादनासाठी सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून देण्याबाबत ऊर्जा विभाग कार्यवाही करणार आहे. संबंधित विभागांना शिफारशींनुसार आवश्यक आदेश निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली असून हा शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

वाढवण बंदर प्रकल्पाविरोधात सर्वपक्षीय भव्य जनआक्रोश सभा; प्रकल्पाविरोधातील लढा तीव्र करण्याचा निर्धार

पालघरची जल, जंगल, जमीन आणि स्थानिकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी सर्वपक्षीय नेत्यांचे एकत्रित आवाहन

जव्हार (वा.)

पालघर जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली राबविण्यात येणाऱ्या वाढवण बंदर प्रकल्पामुळे जिल्ह्यातील पर्यावरण, शेती, मासेमारी, आदिवासींचे अस्तित्व आणि स्थानिकांच्या रोजगारावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हजारो मच्छीमार कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार असून, शेतकरी आणि स्थानिक नागरिकांवरही विस्थापनाचे संकट ओढवण्याची शक्यता आहे. मात्र, या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप वाढवण बंदर प्रकल्पविरोधी सर्वपक्षीय भव्य जनआक्रोश सभेत करण्यात आला.

या सभेत वाढवण बंदर प्रकल्पाविरोधातील आंदोलन अधिक व्यापक आणि तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. पालघर जिल्ह्याची जल, जंगल, जमीन, पर्यावरण आणि स्थानिक जनतेचे पारंपरिक हक्क वाचवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने संघर्ष करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी आंदोलनात सहभागी असल्याचे भासवून सरकारशी हातमिळवणी करणाऱ्या आणि स्वतःच्या स्वार्थासाठी स्थानिकांच्या लढ्याला नुकसान पोहोचविणाऱ्या प्रवृत्तींविरोधातही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. अशा प्रवृत्तींना आंदोलनातून दूर ठेवण्याचा कडक इशारा सभेत देण्यात आला.

वाढवण बंदर प्रकल्प हा केवळ एका गावाचा किंवा परिसराचा प्रश्न नसून संपूर्ण पालघर जिल्ह्याच्या भवितव्याशी निगडित असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. मच्छीमार, शेतकरी, आदिवासी बांधव, स्थानिक व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी हा लढा अधिक संघटितपणे पुढे नेण्याचे आवाहन करण्यात आले.

या सर्वपक्षीय जनआक्रोश सभेला वाढवण विरोधी कृती समितीचे अध्यक्ष नारायण पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार विनोद निकोले, माजी आमदार कपिल पाटील, विलास पोतनीस, हितेंद्र ठाकूर, माजी खासदार बळीराम जाधव, माजी आमदार सुनील भुसारा, जगदाळे, गिरीश राऊत, ओंकार पाटील, अनुप पाटील, अजय ठाकूर, विकास मोरे, केदार दिघे, दीपक राऊत, दीपक पवार, संजय गोपाळ, सत्यम ठाकूर, मनिष गणोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालघर जिल्ह्याच्या नैसर्गिक संपत्तीचे आणि स्थानिकांच्या अस्तित्वाचे रक्षण करण्यासाठी वाढवण बंदरविरोधी आंदोलनाची पुढील दिशा ठरविणारी ही सभा ठरली.

सत्यनिष्ठेतून समृद्धीकडे : भ्रष्टाचारमुक्त समाजाची गरज

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संपन्नतेइतकीच नैतिक संपन्नताही महत्त्वाची असते. एखाद्या देशाकडे आधुनिक तंत्रज्ञान, भक्कम पायाभूत सुविधा, उद्योगधंदे, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि कुशल मनुष्यबळ असले, तरी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा नसेल, प्रशासनात पारदर्शकता नसेल आणि निर्णयप्रक्रियेत न्याय्यतेचा अभाव असेल, तर त्या देशाची प्रगती सर्वसमावेशक होऊ शकत नाही. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून तो समाजातील विश्वास, समान संधी, न्याय आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारा गंभीर प्रश्न आहे. सार्वजनिक पदावरील व्यक्तीने आपल्या अधिकारांचा वापर वैयक्तिक लाभासाठी करणे, नागरिकांच्या हक्कांमध्ये अडथळे निर्माण करणे किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर करणे, यामुळे संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता कमी होते. म्हणूनच सत्यनिष्ठा, सचोटी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये केवळ शासनव्यवस्थेतच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर भारतात दरवर्षी साजरा केला जाणारा दक्षता जनजागृती सप्ताह विशेष महत्त्व प्राप्त करतो. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनाखाली २०२६ मध्ये हा सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत देशभर साजरा केला जात आहे. यंदाची संकल्पना 'सत्यनिष्ठेतून समृद्धी' अशी आहे. या संकल्पनेतून प्रामाणिक आचरण, नैतिक मूल्ये आणि पारदर्शक प्रशासन यांच्या आधारे देशाची शाश्वत समृद्धी साधण्याचा संदेश दिला आहे. हा सप्ताह केवळ सरकारी कार्यालयांमध्ये शपथ घेणे, व्याख्याने आयोजित करणे किंवा जनजागृतीचे फलक लावणे एवढ्यापुरता मर्यादित राहता कामा नये. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक घटकाने स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करून भ्रष्टाचाराला नकार देण्याची आणि प्रामाणिकपणाला स्वीकारण्याची ही संधी मानली पाहिजे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचा संबंध सार्वजनिक प्रशासनातील सचोटी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधाच्या प्रयत्नांशी आहे. केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना १९६४ मध्ये करण्यात आली. पुढे केंद्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ द्वारे आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये, विभागांमध्ये आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये दक्षता प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी आयोग मार्गदर्शन करतो. भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींची दखल घेणे, दक्षता यंत्रणांच्या कार्याला दिशा देणे, प्रतिबंधात्मक उपाय सुचविणे आणि सार्वजनिक सेवांमध्ये नैतिक आचरणाला प्रोत्साहन देणे ही त्याच्या कार्याची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनातील सचोटी आणि कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या आयोजनामागील व्यापक हेतू आहे.

भ्रष्टाचाराची व्याप्ती केवळ लाच घेणे किंवा देणे एवढी मर्यादित नाही. सार्वजनिक अधिकारांचा गैरवापर करून अनुचित लाभ मिळविणे, सरकारी निधीचा अपहार करणे, निविदा प्रक्रियेत संगनमत करणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविणे, पात्र व्यक्तींना डावलून अपात्र व्यक्तींना लाभ देणे, पदाचा प्रभाव वापरून नियमबाह्य निर्णय घेणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचा वैयक्तिक कारणांसाठी वापर करणे, हीदेखील भ्रष्टाचाराची विविध रूपे आहेत. काही गैरप्रकार उघडपणे घडतात, तर काही प्रशासकीय प्रक्रियेतील गुंतागुंत, निर्णयांमधील पक्षपात आणि नियमांच्या संदिग्धतेमुळे घडतात. अनेकदा भ्रष्टाचाराला समाजातील काही घटकांकडून मूक संमती मिळते. 'काम लवकर व्हावे म्हणून पैसे द्यावे लागतात', 'ओळख असल्याशिवाय काम होत नाही' किंवा 'नियमांपेक्षा व्यवहार महत्त्वाचा' अशी मानसिकता भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. ही मानसिकता बदलल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती होणे कठीण आहे.

भ्रष्टाचाराचे परिणाम सर्व समाजघटकांना जाणवतात; मात्र त्याचा सर्वाधिक फटका गरीब, वंचित, ग्रामीण आणि दुर्बल घटकांना बसतो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी नागरिकांना अनावश्यक अडथळ्यांचा सामना करावा लागला, तर योजनांचा मूळ उद्देशच निष्फळ ठरतो. रेशन, घरकुल, शिष्यवृत्ती, रोजगार हमी, आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा आणि शैक्षणिक प्रवेश यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागणे, कागदपत्रांच्या नावाखाली अडवणूक होणे किंवा अनधिकृत पैसे मागितले जाणे ही गंभीर बाब आहे. ज्या व्यक्तीला शासनाकडून मदत मिळणे अपेक्षित आहे, तिलाच आपला हक्क मिळविण्यासाठी अतिरिक्त आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असेल, तर ते सुशासनाचे लक्षण नाही. भ्रष्टाचारामुळे सार्वजनिक सेवांचा खर्च वाढतो, विकासकामांची गुणवत्ता कमी होते आणि समाजातील विषमता अधिक तीव्र होते.

महाराष्ट्राच्या संदर्भात भ्रष्टाचारविरोधी जागरूकतेची गरज अधिक व्यापक आहे. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आणि सार्वजनिक संस्था नागरिकांना सेवा पुरवितात. ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंत पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सिंचन, घरकुल आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च होतो. या निधीचा योग्य वापर झाला, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. परंतु कामे कागदावर पूर्ण दाखविणे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणे, लाभार्थी निवडीत पक्षपात करणे किंवा मंजूर निधीचा गैरवापर करणे यामुळे विकासाच्या संधी हिरावल्या जातात. विशेषतः दुष्काळी आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठा, जलसंधारण, शेतीसंबंधित योजना आणि रोजगाराच्या कामांमध्ये पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय म्हणजे नागरिकांच्या विकासाच्या हक्कावरच घाला होय.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा भ्रष्टाचार प्रतिबंधाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीची महत्त्वाची संस्था असून गावाच्या विकासाशी संबंधित निर्णयांमध्ये नागरिकांना सहभागी होण्याची संधी देते. ग्रामसभेत विकासकामांचे नियोजन, निधीचा वापर, लाभार्थी निवड, कामांची गुणवत्ता आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली पाहिजे. ग्रामपंचायतीने मंजूर कामांची माहिती, खर्चाचा तपशील आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. महिला बचतगट, युवक मंडळे, शेतकरी गट आणि सामाजिक संस्थांनीही सार्वजनिक कामांवर लक्ष ठेवावे. सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कागदोपत्री नोंदी यांची तुलना करता येते. लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या प्रश्नांकडे विरोध म्हणून न पाहता लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.

दक्षता म्हणजे गैरव्यवहार घडल्यानंतर चौकशी करणे एवढेच नव्हे, तर गैरव्यवहार घडण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या त्रुटी आधीच दूर करणे होय. यालाच प्रतिबंधात्मक दक्षता म्हणतात. प्रशासनातील अनावश्यक प्रक्रिया, अस्पष्ट नियम, कामकाजातील विलंब, अधिकारांचा अवाजवी वापर आणि निर्णयप्रक्रियेतील अपारदर्शकता यांमुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते. नागरिकांना एखादे काम करण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, किती शुल्क भरावे लागेल, किती दिवसांत काम पूर्ण होईल आणि विलंब झाल्यास तक्रार कुठे करावी, याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. कार्यालयीन कामकाजात जबाबदारी निश्चित करणे, सेवा देण्यासाठी कालमर्यादा ठरविणे, तक्रारींचा नियमित आढावा घेणे आणि कामकाजाचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार होऊ नये अशी व्यवस्था निर्माण करणे हे भ्रष्टाचार झाल्यानंतर कारवाई करण्याइतकेच महत्त्वाचे आहे.

यंदाच्या सप्ताहाच्या अनुषंगाने केंद्रीय दक्षता आयोगाने १७ ऑगस्ट ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तीन महिन्यांची प्रतिबंधात्मक दक्षता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत प्रलंबित तक्रारींचा निपटारा, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमता वृद्धी, डिजिटल उपक्रम आणि कंत्राट व्यवस्थापन या पाच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. क्षमता वृद्धीच्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान व सायबर सुरक्षितता, सार्वजनिक खरेदी, सरकारी ई-बाजारपेठेतील नव्या सुविधा, आचरणविषयक नियम आणि हितसंबंधांचा संघर्ष यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ तक्रारींची संख्या कमी करणे नसून दक्षता प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणे हा आहे. तक्रारींचा वेळेत निपटारा झाल्यास नागरिकांचा विश्वास वाढतो, तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्यास नियमबद्ध व जबाबदार निर्णयप्रक्रिया विकसित होते.

माहिती तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचार प्रतिबंधासाठी अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. शासकीय सेवांचे संगणकीकरण, ऑनलाइन अर्जप्रक्रिया, ई-निविदा, डिजिटल देयके, थेट लाभ हस्तांतरण आणि ऑनलाइन तक्रार निवारण यांमुळे नागरिकांचा कार्यालयीन फेऱ्यांवरील अवलंब कमी होऊ शकतो. शासकीय खरेदीसाठी ई-खरेदी व्यवस्था आणि सरकारी ई-बाजारपेठ यांचा वापर केल्यास खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यास मदत होते. डिजिटल नोंदींमुळे व्यवहारांचा मागोवा घेता येतो आणि निर्णयप्रक्रियेतील अनियमितता शोधणे सोपे होते. तथापि, तंत्रज्ञान हा भ्रष्टाचाराचा आपोआप

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

नाश करणारा उपाय नाही. डिजिटल व्यवस्थेतही बनावट नोंदी, संगनमत, माहितीचा गैरवापर आणि सायबर गुन्हे घडू शकतात. म्हणूनच माहितीची सुरक्षितता, नियमित तांत्रिक तपासणी, नागरिकांना डिजिटल साक्षरता आणि प्रणालींचे उत्तरदायित्व यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

सार्वजनिक कंत्राटे आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे हेही दक्षता प्रशासनाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. रस्ते, पूल, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा योजना आणि इतर सार्वजनिक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. निविदेच्या अटी विशिष्ट कंत्राटदाराच्या फायद्यासाठी तयार करणे, स्पर्धा मर्यादित करणे, संगनमताने दर निश्चित करणे, प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक खर्च दाखविणे किंवा निकृष्ट दर्जाचे काम स्वीकारणे यामुळे सार्वजनिक पैशाचे नुकसान होते. कंत्राट प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमबद्ध आणि तपासण्यायोग्य असला पाहिजे. कामाची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासली पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर कागदोपत्री प्रमाणपत्राबरोबरच प्रत्यक्ष पडताळणी झाली पाहिजे. कंत्राटदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक निधी हा जनतेच्या मालकीचा आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

भ्रष्टाचारविरोधी लढ्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरिकांसाठी प्रभावी साधन आहे. या कायद्यामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मागण्याचा अधिकार मिळाला आहे. शासकीय निर्णय, निधीचा वापर, विकासकामे, निविदा, लाभार्थी निवड आणि प्रशासकीय कार्यवाही यांसंबंधी माहिती मिळवून नागरिक व्यवस्थेचे परीक्षण करू शकतात. माहितीचा अधिकार हा केवळ कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नसून प्रशासनाला उत्तरदायी बनविण्याचे लोकशाही साधन आहे. मात्र, प्रत्येक माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये. शासकीय कार्यालयांनी महत्त्वाची माहिती नियमितपणे स्वतःहून प्रसिद्ध केली पाहिजे. निर्णयांची कारणे स्पष्ट असावीत आणि तक्रार निवारणाची व्यवस्था सहज उपलब्ध असावी. माहितीचा अधिकार वापरताना नागरिकांनी तथ्याधारित प्रश्न विचारणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणेही महत्त्वाचे आहे.

भ्रष्टाचार उघड करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण करणे ही लोकशाही व्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वेळा गैरव्यवहाराची माहिती असलेल्या व्यक्तींना तक्रार केल्यास बदली, दबाव, छळ किंवा अन्य प्रतिकूल परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी भीती वाटते. त्यामुळे तक्रारदारांची ओळख आणि सुरक्षितता जपणे, तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे आणि सूडबुद्धीने होणाऱ्या कारवाईपासून संरक्षण देणे आवश्यक आहे. केंद्र शासनाशी संबंधित आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रकरणांसाठी आयोगाच्या निर्धारित प्रक्रियेचा उपयोग करता येतो. राज्य शासनाशी संबंधित प्रकरणांसाठी राज्यातील सक्षम दक्षता यंत्रणा किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करता येते. तक्रार करताना पुरावे, कागदपत्रे आणि घटनांचा तपशील अचूक देणे आवश्यक आहे. वैयक्तिक वैरातून केलेले आरोप किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित करणे टाळले पाहिजे.

भ्रष्टाचार रोखण्याची जबाबदारी केवळ शासन आणि प्रशासनाची नाही. नागरिकांच्या दैनंदिन वर्तनातूनही प्रामाणिक सार्वजनिक संस्कृती निर्माण होते. स्वतःचे काम लवकर व्हावे म्हणून नियमबाह्य मार्ग स्वीकारणे, ओळखीचा वापर करून अनुचित लाभ मिळविणे, पात्रता नसतानाही शासकीय योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणे किंवा लाच देऊन काम करून घेणे या कृती भ्रष्ट व्यवस्थेला बळ देतात. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधात बोलताना स्वतःच्या वर्तनाचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. अधिकृत शुल्क भरणे, पावती घेणे, नियमांचे पालन करणे, चुकीच्या मागण्यांना नकार देणे आणि आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडे तक्रार करणे ही जबाबदार नागरिकांची कर्तव्ये आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, कर भरणे आणि सार्वजनिक नियमांचे पालन करणे यांमधूनही सामाजिक प्रामाणिकपणा व्यक्त होतो.

शिक्षणसंस्था आणि युवकांची भूमिका भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीत अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, न्याय, समता, सार्वजनिक हित आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जाणीव करून दिली पाहिजे. निबंध, वक्तृत्व, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे भ्रष्टाचाराचे परिणाम समजावून सांगता येतात. परीक्षेत गैरप्रकार न करणे, संशोधनात साहित्यचौर्य टाळणे, शैक्षणिक कामात पारदर्शकता राखणे आणि संस्थात्मक नियमांचे पालन करणे यांपासून सचोटीची सुरुवात होते. युवक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची माहिती मिळवू शकतात, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारू शकतात आणि ऑनलाइन तक्रार यंत्रणांचा जबाबदारीने उपयोग करू शकतात. मात्र, समाजमाध्यमांवर अप्रमाणित आरोप किंवा चुकीची माहिती पसरविण्याऐवजी तथ्यांची पडताळणी करूनच जनजागृती करणे आवश्यक आहे.

महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही भ्रष्टाचारविरोधी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ग्रामीण भागातील महिला बचतगट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यासपीठ नसून सामाजिक जागरूकता आणि सामूहिक निर्णयक्षमतेचे माध्यम बनू शकतात. सार्वजनिक वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा, शाळांमधील सुविधा, आरोग्यसेवा आणि स्थानिक विकासकामांबाबत महिला संघटितपणे प्रश्न उपस्थित करू शकतात. स्वयंसेवी संस्थांनी नागरिकांना कायदेशीर अधिकारांची माहिती द्यावी, तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे आणि प्रशासनाशी रचनात्मक संवाद साधावा. भ्रष्टाचारविरोधी चळवळ ही केवळ दोष दाखविणारी न राहता चांगल्या प्रशासनासाठी लोकसहभाग वाढविणारी असली पाहिजे.

भ्रष्टाचाराचे आर्थिक परिणामही दूरगामी असतात. सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्यास शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध असलेली साधने कमी पडतात. निकृष्ट दर्जाची कामे झाल्यास त्यांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा सार्वजनिक पैसा खर्च करावा लागतो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात लाचलुचपत किंवा पक्षपात वाढल्यास प्रामाणिक उद्योजकांचा उत्साह कमी होतो आणि समान स्पर्धेचे वातावरण बाधित होते. याउलट, नियमांची स्पष्टता, समान संधी, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि विश्वासार्ह संस्था यांमुळे आर्थिक व्यवहारांना स्थैर्य मिळते.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार, 1 नोव्हेंबर 2026

बाळासाहेब घुगे यांची भाजपमध्ये घरवापसी

गिरीश महाजन, सिमाताई हिरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

नाशिक (प्रतिनिधी) –

गेल्या दहा महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाच्या सक्रिय कार्यापासून दूर असलेले बाळासाहेब मारुती घुगे यांनी पुन्हा एकदा भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला आहे. दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथे कुंभमेळा मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन आणि आमदार सिमाताई महेश हिरे यांच्या हस्ते त्यांचा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी बोलताना बाळासाहेब घुगे यांनी सांगितले की, गेल्या दहा महिन्यांपासून आपण भाजप परिवारापासून शारीरिकदृष्ट्या दूर होतो मात्र आपले मन, विचार आणि निष्ठा कायम भारतीय जनता पक्षासोबतच होती. या काळात दिव्यांग बांधवांसाठी केलेले सामाजिक कार्य, विविध उपक्रम आणि संघर्ष हे आमदार सिमाताई महेश हिरे तसेच भाजपा शहराध्यक्ष सुनील नाना केदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होते.

भाजपमध्ये पुन्हा प्रवेश केल्यानंतर दिव्यांग, विधवा, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पक्षप्रवेशप्रसंगी आमदार सिमाताई महेश हिरे, मार्गदर्शक महेश भाऊ हिरे, गटनेते श्याम भाऊ बडोदे, नाशिक महानगर सरचिटणीस रेशमी ताई हिरे बेडाळे, ज्येष्ठ नेते रामहरी सभेराव, सिडको मंडल अध्यक्ष वैभव महाले, मंडल अध्यक्ष राजेंद्र जडे, रंगनाथ दरगुडे, माजी सरचिटणीस तसेच भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी आणि दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाळासाहेब मारुती घुगे हे सिद्धिविनायक मानव कल्याण मिशन (दिव्यांग सेल), महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी यापुढेही सक्रियपणे काम करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी सर्वांचे आभार मानत भविष्यातही सहकार्य आणि आशीर्वाद कायम ठेवण्याचे आवाहन केले.

मराठी शुद्धलेखन व व्याकरण कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन डोळे गुरुजींनी उलगडले भाषेचे महत्त्व

सिरसाळा | अतुल बडे

विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या शुद्धलेखनाची आणि व्याकरणाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने आयोजित मराठी व्याकरण कार्यशाळेत मराठी व्याकरणाचे गाढे अभ्यासक डोळे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी मार्गदर्शन केले. आपल्या खास शैलीत त्यांनी मराठी भाषेतील शुद्धलेखन, व्याकरणाचे नियम, शब्दांची अचूक रचना आणि भाषेचा योग्य वापर याविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय चापोलीकर सर होते. यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक घोडके सर, केंद्रप्रमुख माळी सर, सरपंच विठ्ठल गित्ते सर, माजी पोलीस पाटील राजाभाऊ तांदळे, सोनवणे सर, जाधव मॅडम, कडभाणे सर, देवकते सर, माले मॅडम, जांभळे मॅडम आणि गिरी सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेदरम्यान डोळे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व पटवून देत शुद्ध लेखन, योग्य उच्चार आणि व्याकरणाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा अचूक आणि प्रभावी वापर कसा करावा, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या शुद्धलेखन व व्याकरणाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरला.

मराठी भाषा ही आपली सांस्कृतिक ओळख असून तिचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगावा, तिचा शुद्ध आणि योग्य वापर करावा, यासाठी कार्यशाळेच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करण्यात आले.

गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याकडून शेतकरी सभासदांना गुळ पावडरचे वाटप सुरू

लातूर | लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ऍग्रो फूड इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याच्या प्रत्येक शेतकरी सभासदांना दीपावलीच्या निमित्ताने दहा किलो गुळ पावडर देण्यात येत असून कारखान्याचे संस्थापक श्री तुळशीरामअण्णा कराड आणि रणवीर राजेश कराड यांच्या हस्ते गुळ पावडर वाटपाचा शुभारंभ शनिवारी सकाळी करण्यात आला.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आग्रहाखातर रामेश्वर परिसरात उभारण्यात आलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याने यावर्षीपासून शेतकरी सभासदांची दिपावली गोड व्हावी यासाठी प्रत्येक शेतकरी सभासदांना तीस रुपये दराने दहा किलो गुळ पावडर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला त्यानुसार आज शनिवार रोजी मौजे काटगाव येथील कारखान्याच्या गट कार्यालयात कारखान्याचे मुख्य प्रवर्तक श्री तुळशीरामअण्णा कराड

आणि रणवीरदादा कराड यांच्या शुभ हस्ते गुळवाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी शेतकी अधिकारी संतोष जाधवर ,रमेश सोट, प्रशांत शिंदे, आकाश कदम, दीपक शिंदे, अशोक सोट यांच्यासह कारखान्याचे कर्मचारी शेतकरी सभासद मोठ्या संख्येने होते.

संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याच्या शेतकरी सभासदांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी दहा किलो ३० रुपये दराने येत्या ५ नोव्हेंबर पर्यंत गुळ पावडर काटगाव, तांदूळजा, भोकरंबा आणि रेणापूर या कारखान्याचे गट कार्यालयातून वाटप करण्यात येणार आहे तेंव्हा सर्व शेतकरी सभासदांनी आपापल्या गट कार्यातून गुळ पावडर घेऊन जावे असे आव्हान चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

कपिलधार यात्रेसाठी पायी दिंड्यांना पाण्याचे टँकर व वाहतूक पोलीस बंदोबस्त द्या!

वीरशैव विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष शिवकुमार केदारी यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी; महाराष्ट्र-कर्नाटकातून येणाऱ्या ७० हून अधिक दिंड्यांच्या सुविधांकडे प्रशासनाने लक्ष द्यावे

परळी वैजनाथ | (प्रतिनिधी)

श्रीक्षेत्र कपिलधार (जि. बीड) येथे संत शिरोमणी शिवयोगी मन्मथ स्वामी यांच्या कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त महाराष्ट्र व कर्नाटकातून येणाऱ्या पायी दिंड्यांतील हजारो भाविकांसाठी बीड जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केल्यापासून पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून द्यावेत. तसेच दिंड्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी प्रमुख मार्गांवर वाहतूक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा, अशी आग्रही मागणी वीरशैव विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार राजेश्वर आप्पा केदारी यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्रीक्षेत्र कपिलधार येथे २४ नोव्हेंबर २०२६ रोजी संत शिरोमणी शिवयोगी मन्मथ स्वामी यांच्या कार्तिक पौर्णिमा यात्रेचे आयोजन होत आहे. या यात्रेसाठी महाराष्ट्र व कर्नाटकातील विविध भागांतून ७० पेक्षा अधिक पायी दिंड्या अनेक दिवसांचा प्रवास करून कपिलधार येथे दाखल होतात. या दिंड्यांमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व हजारो शिवभक्त सहभागी असतात.

सध्याची बीड जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती व पाणीटंचाई लक्षात घेता पायी प्रवास करणाऱ्या भाविकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने यात्रेपूर्वीच दिंडी मार्गांचे नियोजन करून प्रत्येक दिंडीला जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केल्यापासून कपिलधार येथे पोहोचेपर्यंत आवश्यकतेनुसार स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

■ **दिंड्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक पोलीस तैनात करा!**

अनेक पायी दिंड्या राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग व वर्दळीच्या रस्त्यांवरून प्रवास करतात. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रमुख चौक, धोकादायक वळणे व दिंडी मार्गांवर वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात यावा. यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी संबंधित सर्व पोलीस ठाण्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशीही मागणी केदारी यांनी केली आहे.

निवेदनात एकूण नऊ प्रमुख मागण्यांचा समावेश असून, दिंडीप्रमुखांशी समन्वय साधणे, मुक्कामस्थळी पाण्याची व्यवस्था करणे, पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करणे, स्वतंत्र संपर्क अधिकारी व नियंत्रण कक्ष नियुक्त करणे तसेच महसूल, पोलीस, आरोग्य व पाणीपुरवठा विभागांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

■ **भाविकांची सेवा ही प्रशासनाचीही सामाजिक जबाबदारी – केदारी**

"संत शिरोमणी शिवयोगी मन्मथ स्वामी यांच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या शिवभक्तांना पिण्याच्या पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागू नयेत. भाविकांची सेवा करणे ही केवळ धार्मिक बाब नसून मानवतेचे कर्तव्य आहे. प्रशासनाने यात्रेपूर्वीच योग्य नियोजन करून प्रत्येक दिंडीला पिण्याचे पाणी व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी," अशी भावना शिवकुमार केदारी यांनी व्यक्त केली.

सदर निवेदनाच्या प्रती मा.ना.सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री म.रा.तथा पालकमंत्री बीड जिल्हा,मा.ना.पंकजाताई मुंडे,मा.आ.धनंजय मुंडे साहेब,पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, निवासी उपजिल्हाधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्याधिकारी साहेब नगरपरिषद परळी वै तसेच संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत.